# प्रा.शर्मिला रेगे यांचे योगदान

## अभ्यास, सिद्धांतन आणि जिवंत सामाजिक प्रक्रियांशी जैव आणि द्वंद्वात्मक नाते

**संजयकुमार कांबळे** □



**व्यासंगी स्त्रीवादी अभ्यासक शर्मिला रेगे यांचं अलीकडेच निधन झालं. पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रात कार्यरत असणाऱ्या त्यांच्या तरुण सहकाऱ्याने त्यांच्याविषयी लिहिलेला हा लेख. आठवणींना उजाळा देणारा आणि शर्मिला रेगे या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवणारा.**

महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरच्याही परिवर्तनवादी व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या दोन पिढ्यांवर प्रा. शर्मिला रेगे यांचा प्रभाव आहे. सभ्यता, नीतिमत्ता आणि चांगल्या शैक्षणिक संस्कृतीचे शर्मिला रेगे प्रतीक होत्या. शर्मिला रेगे या एक उत्कृष्ट शिक्षक होत्या. शर्मिला रेगे विद्वान अभ्यासक, लेखक आणि शिक्षक म्हणून श्रेष्ठ आहेतच, पण अनेकांच्या मित्र म्हणून त्यांनी पेरलेली मैत्री प्रत्येक स्नेह्याचा अंतस्थ श्रेष्ठ ठेवा आहे. स्वत:च्या वैचारिक जाणिवांशी प्रामाणिक राहून प्रा. शर्मिला रेगे यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांसाठी समर्पित केले. तर्कशुद्ध विचार, नर्मविनोद, विनम्र स्वभाव, भूमिकेतील सच्चेपणा आणि कमालीचे सामंजस्य या गुणांनी मंडित असलेल्या रेगे मॅडम दलितांसह दलितेतर समाजात प्रसिद्ध होत्या. त्यांच्याविषयीची आत्मीयता हा अनेकांच्या अभिमान व समाधानाचा विषय आहे.

विचार व लेखनासाठी मिळालेल्या अल्प कालावधीत त्यांनी ज्ञानाच्या क्षेत्रात मैलाचे दगड ठरतील अशा ग्रंथांचे लेखन केले. विद्यार्थी दशेपासून संशोधनाचा पिंड असणाऱ्या शर्मिला रेगे यांनी १९८७ मध्ये समाजशास्त्रात एम.ए. पदवी संपादन केली. १९८९ मध्ये एम.फिल पदविकेसाठी त्यांनी 'Sati : A Sociological Analysis या विषयावर लघुशोधनिबंध लिहिला. १९९५ मध्ये 'From Malestream Sociology to a Gender Sensitive Sociology' या विषयावर पीएच.डी.चा प्रबंध सादर करुन समाजशास्त्राची स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून चिकित्सा केली. त्यानंतर Sociology of Gender (2003), Writing Caste, Writing Gender : Narrating Dalit Women's Testimonios (2006) Education as a tritiya ratna towards Phule-Ambedkarite feminist Pedagogical practice (2009) स्त्रीवाद: जागतिक आणि स्थानिक द्वैतांच्या पलिकडे (२०११) लोकप्रिय संस्कृती व भारतातील आधुनिकता : लिंगभाव परिप्रेक्ष्यातून (२०१२) Against the madness of Manu: (B.R. Ambedkar's writings on Brahmanical patriarchy (2013) हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध झाले. इ.स. २००३ मध्ये शर्मिला रेगे यांचे लिंगभावाचे समाजशास्त्र: स्त्रीवादी समाजशास्त्रीय ज्ञानाने

दिलेले आव्हान, या नावाचे संपादित पुस्तक इंग्रजीमधून प्रसिद्ध झाले. भारतीय समाजशास्त्राला स्त्रीवादी विचारातून कसा शह दिला जात आहे याची अतिशय शिस्तशीर मांडणी या पुस्तकाच्या परिचयामध्ये शर्मिला रेगे यांनी केली आहे. समाजशास्त्र नावाची ज्ञानशाखा १९६० आणि १९७० या दशकांमध्ये स्त्रीवादी चौकटी आणि अभ्यास यामुळे कशी बदलली हे सांगताना रेगे यांनी जागतिक पातळीवर स्त्रीवादी प्रबोधन कसे घडले याची मांडणी केलेली दिसते. प्रस्थापित समाजशास्त्राची ज्ञानशाखा, समाजविज्ञानाचे खुले होणे या गोष्टीकडे कशा तऱ्हेने पाहत होती आणि स्त्री अभ्यासाकडे 'स्त्रियांनी, स्त्रियांसाठी, स्त्रियांपुरते केलेले ज्ञान' एवढ्याच चौकटीत कसे गोठवून टाकत होती, हे डॉ. रेगे यांनी दाखवून दिले. आधीच्या अहवालांचा स्वत:च्या पद्धतीने आढावा घेऊन, दलित आणि स्त्रीवादी चळवळ आणि चळवळीतून आलेले ज्ञान समाजशास्त्रीय ज्ञानाच्या दरवाजावर कसे धडका देत होते याचे मार्गदर्शन त्यांनी केले आहे. शर्मिला रेगे म्हणत की, आपल्या समाजाचा विचार व तदनुरुप कृती करावयाची झाल्यास जात, वर्ग आणि लिंगभावाचे संदर्भ विसरुन चालणार नाही. पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र आणि स्त्री अभ्यासाच्या विद्यार्थ्यांना शिकविताना त्यांनी सिद्धांत, संकल्पना आणि विश्लेषणाकडे पाहण्याची जागृत दृष्टी दिली आणि विश्लेषण करीत असताना बाजू घेण्याचे आवाहन केले. इतर विद्यापीठ आणि महाविद्यालयातील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानाचा, व्यासंगाचा, मार्गदर्शनाचा नेहमीच फायदा झालेला आहे. समाजातील गुंतागुत, कोणत्याही प्रश्नाची व्यामिश्रता आणि वास्तवाचे विविधांगी पैलू हे नजरेआड केले जाऊ नयेत असा त्यांचा आग्रह असे. भूमिका घेताना व्यक्तींना वा संघटनांना ठामपणा लागतो तो असलाच पाहिजे पण याचा अर्थ ठोकळेबाज भूमिका घेणे असा होता कामा नये असे त्या आग्रहाने मांडत.

फुले-आंबेडकरवादी म्हणवून घेत असताना त्या प्रज्ञा, मैत्री, करुणा आणि न्याय या तत्त्वांचा अवलंब करून इतरांशी संवाद साधायच्या. याच गुणांचा अवलंब करून १९९५ मध्ये स्त्रीवादी पद्धतीशास्त्र विकसित केल्यानंतर २००८च्या नंतर अध्यापन पद्धतीत फुले-आंबेडकरवादी पद्धतीशास्त्रीय परिप्रेक्ष्याचा अवलंब करून प्रज्ञा म्हणजे चिकित्सक आकलन, करुणा म्हणजे सहभावनावादी प्रेम हा विचार त्यांनी रुजवला.

प्रा. शर्मिला रेगे यांची जिज्ञासा, विद्वत्ता व बांधिलकी ही निव्वळ विद्यापीठीय नव्हती. केवळ बौद्धिक औत्सुक्य वा कसरत हा तिचा पाया नव्हता. त्यांच्या सर्व वैचारिक व बौद्धिक प्रयासांमागे सामाजिक संबंधातील मूलभूत परिवर्तनाची प्रेरणा होती. जीवनाला अर्थ प्राप्त करून द्यावयाचा असेल तर व्यक्तिवाद आणि स्वार्थ यांचा त्याग करून व्यक्तिगत व सामाजिक संबंध पूर्णत: बदलायला हवेत, ही त्यांची धारणा होती. हे बदल व्हायचे तर आधी सामाजिक समता, न्याय, लोकाशाही स्थापन व्हायला हवीत; वर्ग, धर्म, जात, लिंग यावर आधारलेले सर्व भेद मिटायला हवेत, हे त्या मानत असत. यासाठी वर्गीय, वर्णीय, जातीय, धार्मिक भेद व पुरुषसत्ता मिटवायची असेल तर सामाजिक-राजकीय संघर्षाला पर्याय नाही, हे ही त्या मानत होत्या. चळवळी उभ्या करताना, मोर्चे-आंदोलन संघटित करताना त्याला ज्ञानाचा पाया असतो आणि ज्ञान निर्मितीचीही एक चळवळ असते. चळवळ आणि अभ्यास, सिद्धांत आणि व्यवहार यांच्यातील फारकत त्यांनी मान्य केली नाही. सिद्धांत आणि व्यवहार याचा सहसंबंध त्यांनी केवळ लिखाणापुरता लावला नव्हता तर जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये अंगिकारला होता. सत्यशोधक, विद्रोही, दलित-बहुजनवादी चळवळी व सर्वच विद्यापीठीय ज्ञानशाखांना वैचारिक ऊर्जा देणारे केंद्र बनवणे हे डॉ. शर्मिला रेगे यांचे खरे योगदान होते.

त्या काही 'चॅरिटेबल ट्रस्ट' नसतानाही इतरांना प्रोत्साहन देण्याचा भाग म्हणून त्या स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करायच्या अशी मदत करताना शर्मिला रेगे यांचे ऐकले पाहिजे किंवा त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणेच काम केले पाहिजे असा कोणताही उपकाराचा हेतू नसायचा. त्यांच्या मृत्यूनंतरसुद्धा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदत व्हावी म्हणून तशी तरतूद केली आणि त्याबद्दल अनिल सैनी या जीवनसाथी सोबत मृत्यूपूर्वी चर्चा केली होती. एखादी प्रशासकीय भूमिका बजावत असताना ती किती लोकशाहीवादी आणि पारदर्शक बनू शकते याचा अनुभव समाजशास्त्र आणि स्त्री अभ्यासातील आम्हा सगळ्या रेगे मॅडमच्या सहकाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना आहे. सर्वसाधारणपणे नव्या कल्पना, नवे उपक्रम, नवे कार्यक्रम यांचे शर्मिला रेगे उत्साहाने स्वागत करीत. रेगे मॅडम यांनी खाजगी मालमत्ता अथवा संकुचित, वैयक्तिक महत्वाकांक्षा यांची तमा कधीही बाळगली नाही. शैक्षणिक क्षेत्रातील आव्हाने स्वीकारायला त्यांना फार आवडायचे. लोकसंग्रह व एकांत, बहुआयामी वक्तृत्व व एकजिनसी लेखन, तसेच वास्तववाद व स्वप्नदर्शित्व यातील कोणत्याही एका ध्रुवावर अढळ न राहता दोन्ही ध्रुवांना स्पर्श करण्याची किमया शर्मिला रेगे यांनी साधली होती.

शर्मिला रेगे यांना एखादी गोष्ट पटली नाही वा एखाद्या गोष्टीविषयी त्यांना नापसंती दाखवायची असेल तर त्या संयमाने पण ठामपणे आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत. नापसंतीचा चढा सूर त्या लावत नसत. प्रतिक्रियेतून अहंकार प्रकट होत नसे. उलट ज्याच्याबद्दल तक्रार आहे ती व्यक्तीदेखील त्यांच्या एकूण प्रतिक्रियेबद्दल नाराज होत नसे. संबंधात कटुता न येऊ देता आपले म्हणणे मांडण्याचे कसब त्यांच्याजवळ होते. माणसांशी संबंध जोडणे आणि ते टिकविणे याकडे त्यांचा कल होता. आपल्यामुळे कुणी दुखावला जाऊ नये याची काळजी त्या घेत प्रसंग पाहून निर्णय घेत. आपण मोठे विद्वान अभ्यासक आहोत, आपली बडदास्त ठेवली गेली पाहिजे, असा त्यांचा आग्रह नसायचा. मात्र आपला आत्मसन्मान दुखावला जाऊ नये याचीही काळजी त्या घेत असत. परिस्थितीचे भान असणाऱ्या त्या प्रज्ञावंत होत्या.

प्रा. शर्मिला रेगे यांचा व्यासंग, चिंतन व वाचन थक्क करणारे



**ज्ञानार्जन, अर्जित ज्ञानाचे नव्या अभ्यासातून वितरण व डाव्या चळवळीचे वैचारिकीकरण, पुनर्भरण हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. आयुष्यभर हे काम त्या सातत्याने करीत राहिल्या. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक सतत अभ्यासत असावा लागतो, याची जाण त्यांनी सांभाळली. त्यांचा परिवर्तनाच्या एकाच एक मार्गावर विश्वास नव्हता. त्यामुळे दलित चळवळ, स्त्रीवादी आणि मार्क्सवादी चळवळींच्या माध्यमातून परिस्थितीतील गुंतागुंत कशी जाणून घेता येईल आणि ती सोडवता पण येईल याचा त्या विचार करीत असत.**

होते. विशेषज्ञांच्या व अतिविशेषज्ञांच्या काळात विशिष्ट विषयातील ज्ञानाची खोली वाढत गेली तरी अनेकदा क्षितीजांची व्याप्ती व विविध ज्ञानशाखांच्या परस्परसंबंधांची जाण कधी कधी संकुचित होते. जीवन, समाज व विश्व यांचे मग एक सम्यक तत्वज्ञान निर्माण होण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. नेमकी ही जाणीव प्रा. शर्मिला रेगे यांना नेहमीच होती व म्हणूनच विविध ज्ञानशाखातील घडामोडी व त्यांचा समाजजीवनावर होणारा परिणाम याबाबत त्या नेहमीच जागरुक असायच्या. त्यामुळे त्यांनी लिंगभाव अभ्यास आणि समाजशास्त्र, लिंगभाव अभ्यास आणि संस्कृती अभ्यास, लिंगभाव आणि दलित अध्ययन आणि या सगळ्यांची अभ्यासपद्धती (Pedagogy) काय असली पाहिजे याचे सदैव चिंतन केले आणि विविध अभ्यासविषयात सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

शर्मिला रेगे केवळ विद्यार्थ्यांचीच आस्थेने विचारपूस करीत नसत तर त्या त्यांच्या कुटुंबीयांचीसुद्धा तशीच विचारपूस करीत. आपल्यामुळे समोरच्या व्यक्तींची कोणतीही गैरसोय वा अडचण होऊ नये याची त्या दक्षता घेत. त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्यामुळे तर संबंध अधिकच स्नेहपूर्ण होत असत. नव्या पिढीशी संवाद आणि जुन्या मंडळीशी स्नेह हे शर्मिला रेगे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांचा लोकसंग्रहही मोठा होता. आपल्या संयमी, ऋजू स्वभावामुळे त्यांनी अनेक माणसे जोडली होती. त्यांच्याकरता त्यांच्या सानिध्यातील प्रत्येक जण हा विशिष्ट व्यक्ती होती. हा भाव फक्त काहीच लोकांना साधता येतो.

ज्ञानार्जन, अर्जित ज्ञानाचे नव्या अभ्यासातून वितरण व डाव्या चळवळीचे वैचारिकीकरण, पुनर्भरण हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. आयुष्यभर हे काम त्या सातत्याने करीत राहिल्या. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक सतत अभ्यासत असावा लागतो, याची जाण त्यांनी सांभाळली. त्यांचा परिवर्तनाच्या एकाच एक मार्गावर विश्वास नव्हता. त्यामुळे दलित चळवळ, स्त्रीवादी आणि मार्क्सवादी चळवळींच्या माध्यमातून परिस्थितीतील गुंतागुंत कशी जाणून घेता येईल आणि ती सोडवता येईल याचा त्या विचार करीत असत. भावी समाजाच्या जडणघडणीसाठी 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' या बाबासाहेबांच्या विचारांवर लक्ष केंद्रित करून 'Class Room' हा त्यांना परिवर्तनाचा लक्ष्य गट वाटत होता. त्यांनी शिकवायचं म्हणून शिकविले नाही. एखाद्या प्रश्नाच्या किती बाजू असू शकतात, त्या प्रश्नाचा विकास कसा झाला आहे, आता तो प्रश्न कोणत्या अवस्थेत आहे. त्यावर कोणकोणती संशोधने झाली आहेत या सगळ्याचा संदर्भ त्या द्यायच्या.

त्यांच्या अध्यापन पद्धतीचे (Pedagogy) वैशिष्ट्य म्हणजे त्या वर्गात चलचित्रपट, माहितीपट इ.सारख्या दृश्य माध्यमांच्याद्वारे विद्यार्थ्यांना त्या विषयाची माहिती द्यायच्या. त्यांचे तास मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांतून होत असत. त्यांचे अध्यापन घड्याळी अडीच तास ते चार तास चालत असे. त्यांनी वर्गात अध्यापन सहाय्यक तयार केले होते. प्रत्येक तासाला हे अध्यापन सहाय्यक वर्गात उपस्थित राहत असत. मी ज्यावेळी त्यांचा अध्यापन सहाय्यक होतो त्यावेळी वर्गात त्यांना प्रश्न विचारल्यानंतर त्या प्रश्नाचे एका सेकंदाच्या आत विशिष्ट भूमिका घेऊन सखोल उत्तर द्यायला त्या सुरुवात करायच्या.

शर्मिला रेगे यांनी ब्रिज कोर्सची निर्मिती केली आणि त्या माध्यमातून ज्ञान आणि कौशल्य यात सांगड घालण्याचे काम केले. ग्रामीण आणि शहरी व मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळी कौशल्ये आणि ज्ञान असते. त्यांचे एकमेकांना आदान-प्रदान केले तर ते परस्परांना पूरक राहिल आणि त्यात दोघांचाही फायदा होईल असे त्यांना वाटे.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुरुप वर्गातील शिकण्या-शिकविण्याचे व्यवहार बदलताना अत्यंत आधुनिक, जगण्याशी भिडू शकणारा अभ्यासक्रम, वर्गातील बदललेला सामाजिक चेहरा समजून घेऊन स्वहित, अहंकारापासून मुक्त होऊन स्वचिकित्सा करणारी अध्यापनपद्धती शर्मिला रेगे यांनी स्वीकारली होती. त्यामुळे आमच्यापैकी अनेकांचे स्त्री अभ्यासाशी नाते जुळू लागले. रेगे मॅडम वर्गात प्रत्येकवेळी वेळेवर उपस्थित राहायच्या. दोन तासाचे लेक्चर असेल तर त्यासाठी त्या सात ते आठ तास वाचन करीत असत. प्रत्येक वेळी नवीन लेक्चर नोट्स काढत, पण त्या कधीही पॉइंट्स पाहून शिकवित नसत. वेगवेगळ्या प्रकारे जगाला, समाजाला समजून घेण्याचा व बदलण्याचा मानवी प्रयत्नाचा इतिहास त्या संकल्पना, पद्धतीशास्त्र आणि दलित स्त्रीवादी दृष्टिकोनाच्या माध्यमातून उलगडून दाखवत. विचारांच्या जगातून फिरवून आणल्यासारखे आम्हाला वाटायचे. सामाजिक शास्त्रातील प्रस्थापित सिद्धांतांचे मुंडके पकडून आपल्या अनुभव

परिस्थितीतून त्याला प्रश्न विचारले पाहिजेत, हा आत्मविश्वास निर्माण करून भूमीदृष्टी आणि सिद्धांत रचण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. कोणत्याही प्रश्नांचा, घटनांचा विचार करताना त्या मूलगामीपणे आणि समग्रतेने विचार करायच्या. अभ्यासांचे, विचारांचे परिवर्तनवादी विचारांशी, चळवळीशी घनिष्ठ नाते असले पाहिजे, तसेच सार्वजनिक जीवनात योग्य वैचारिक हस्तक्षेप केला पाहिजे, हेच सूत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिले.

संशोधन करताना लिहिलेला प्रत्येक शब्द वाचून आणि विद्यार्थ्यांचे शांतपणे ऐकून त्याला अजून काही गोष्टी, मुद्दे, पुस्तके त्या सुचवत असत. टाकाऊ गोष्टीचे टिकाऊत रूपांतर करण्याचा त्या प्रयत्न करत असत. संशोधनाबाबत मोकळेपणाने आणि स्पष्टपणे चर्चा किंवा महत्त्वाच्या सूचना करीत असत. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासकांच्या ज्ञानाचा आणि कामाचा परिचय व्हावा म्हणून त्या अशा अभ्यासकांना वर्गात आणि चर्चासत्रात बोलण्याकरता बोलवत असत. इतकेच नव्हे तर विविध चळवळीतील नेते, कार्यकर्ते यांनाही त्या बोलवत. विद्यार्थ्यांना विविध मार्गांतून ज्ञान देऊन कसे समृद्ध करता येईल याचाच ध्यास त्यांनी घेतलेला होता.

स्त्री अभ्यासाचे मराठी ज्ञानविश्व समृद्ध करून मराठी वाचकाला त्याचा उपयोग करता यावा म्हणून त्यांनी इंग्रजीतील महत्त्वाच्या साहित्याचा मराठीत अनुवाद केला. तर इंग्रजीतसुद्धा ज्या विषयांची चर्चा करण्यात आलेली नाही पण ती मराठीत केली गेली असेल तर त्याचाही त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. यासंदर्भात प्रतिमा परदेशी आणि Writing caste/Writing Gender या पुस्तकातील लेखिकांच्या साहित्याचा त्यांनी केलेला अनुवाद महत्त्वाचा ठरतो. शिक्षणाच्या प्रक्रियेला त्यांनी एका उच्च पातळीवर नेऊन ठेवले. विद्यार्थ्यांना संशोधक म्हणून तयार करण्याकरता त्यांना विविध विषयांवर लिहायला सांगून त्यांची रेगे मॅडमनी पुस्तके तयार केली. आतापर्यंत अशा सहा पुस्तकांची निर्मिती झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या क्षेत्रअभ्यासाकरता दरवर्षी एक सहल काढली जाते. त्यामध्ये लवासाला आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न समजून घेण्यासाठी भेट, बीड येथील एकनाथ आव्हाड यांच्या मानव हक्क अभियानाद्वारे दलितांच्या हक्कासाठी कशा प्रकारचे काम करण्यात आले याची ओळख व्हावी म्हणून भेट अशा भेटी झालेल्या आहेत. अध्यापनाचा दर्जा उंचविण्यासाठी प्रत्येक तासाची उद्दिष्टे, त्याचे विश्लेषण कसे करण्यात येणार आहे, त्यात कोणते मुद्दे, संकल्पना आणि उदाहरणे आहेत, या संदर्भात कोणते वाचनसाहित्य स्वत:साठी आणि विद्यार्थ्यांसाठी देणार आहोत याची यादी तासाच्या काही दिवस अगोदर केली जायची.

५ सप्टेंबर या सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती ऐवजी २८ नोव्हेंबर - महात्मा फुले पुण्यतिथी हा शिक्षक दिन साजरा करण्यात यावा म्हणून त्या विद्यार्थ्यांना प्रेरित करत असत. वर्गात विविध जात-वर्गातील शोषित घटकातील विद्यार्थी असत. त्याबाबत त्या जागरुक होत्या. विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अशा विद्यार्थ्यांना मदत मिळवून देण्यासाठी त्या विशेष प्रयत्न करणार होत्या. त्यांनी मागच्या दोन वर्षात आदिवासी, पारधी, वडार, घिसाडी, दलित या जात गटातील मुलामुलींना शिक्षणाकरता स्त्री अभ्यास केंद्रात कसे आणता येईल याकरता माझ्यावर अशा विद्यार्थ्यांचा शोध घेण्याची विशेष जबाबदारी सोपवली होती.

दलित स्त्रीवाद आणि लोकप्रिय संस्कृती आणि उच्च शिक्षण हा त्यांच्या विशेष आवडीचा विषय असे. त्यांच्या दलित स्त्रीवादी भूमीदृष्टी या विचारावर बरीच टीकासुद्धा झाली. मार्च २०१३ च्या Economic and Political Weeklyच्या स्त्रीअभ्यासाविषयीच्या विशेषांकाच्या संपादक मंडळात त्या होत्या. त्यांच्या संपादकीय लेखनावर विषारी टीका करण्यात आली. त्यात असे म्हटले गेले की हे संपादकीय 'दलित स्त्रियांचा आवाज चोरत आहे.' परंतु संपादक मंडळातील लेखिका जन्माने जरी दलित नसल्या तरी दलित स्त्रीवादी दृष्टीकोन स्वीकारून त्याचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. जन्माने दलित नसणाऱ्यांवर अशा टीका करणे सोपे असते हे टीका करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. शर्मिला रेगे म्हणतात, एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर दलितातील दलित स्त्रियांच्या लढ्यातून आणि कार्यक्रमातून तयार होणारा स्त्रीवादी जागतिक दृष्टीकोन हा एकमेव मुक्तीदायक दृष्टीकोन ठरेल. (संदर्भ- स्त्री : असलेली, घडवलेली आणि दाखवलेली. मिळून साऱ्याजणी - दिवाळी १९९७)

महाराष्ट्रातील दलित लेखिकांविषयी उर्मिला पवार यांना पुस्तक लिहायला सांगून त्या पुस्तकाचे प्रकाशन आणि लेखिकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात रेगे मॅडमनी पुढाकार घेतला आणि त्या कार्यशाळेचा सह-समन्वयक मला केले. महाराष्ट्राच्या इतिहासात या सगळ्या दलित लेखिका पहिल्यांदाच एकत्र येत होत्या. अनेक दलित लेखिकांनी पहिल्यांदाच पुणे विद्यापीठ पाहिले होते. या कार्यशाळेत या लेखिकांना बोलण्यास संधी मिळाली पाहिजे म्हणून या कार्यशाळेत त्या काहीही बोलल्या नाहीत. या कार्यशाळेत रावसाहेब कसबे, विद्युत भागवत, प्रज्ञा दया पवार आणि मनोहर जाधव व सर्व दलित लेखिकांना बोलण्याची संधी देण्यात आली. इतकेच नाही तर दलित लेखिकांच्या पुस्तकाला प्रस्तावनासुद्धा त्यांनी स्वत: न लिहिता उर्मिला पवार लेखिका आहेत, त्यांनीच लिहिली पाहिजे असा आग्रह धरला. ज्यावेळी छाया दातार यांनी 'Non-Brahmin Renderings of Feminism in Maharashtra : Is it a more Emancipatory force?' (EPW, Oct 9, 1999) हा लेख लिहून दलित स्त्रीवादासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आणि पर्यावरणवादी स्त्रीवाद हा दलित स्त्रीवादापेक्षा महत्त्वाचा आहे असा दावा केला तेव्हा शर्मिला रेगे यांनी त्याला विरोध करून 'Real Feminism' and Dalit Women : scripts of Denial and Accusation' हा लेख लिहून प्रबळ असे प्रत्युत्तर दिले.

शर्मिला रेगे म्हणतात, वसाहतकालीन समाजसुधारणा चळवळीने जातीअंताच्या न्यायव्यवस्थेचा आधार घेऊन शोषित गटांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला होता. उत्तर वसाहतवादी दृष्टीकोनाचा अवलंब करणाऱ्या स्त्रीवादी अभ्यासक या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करून सर्वच

(पुढील मजकूर पान २० वर)

*(पान १७ वरून)*

## प्रा. शर्मिला रेगे यांचे योगदान

सुधारणा कशा पाश्चात्य होत्या हे अधोरेखित करतात. या सैद्धांतिक बैठकीतील अभ्यासक मग ओघानेच वसाहतकाळातील फुले-आंबेडकरी चळवळीच्या अभ्यासाकडे वळलेले दिसत नाहीत. अलीकडे दलित स्त्रियांनी केलेल्या मांडणीकडे मग ते एक नवा/वेगळा/विभिन्न आवाज म्हणून पाहताना दिसतात. दलित स्त्रियांच्या या आवाजाला उत्तर-आधुनिकतेच्या छायेतील विभिन्नत्वाच्या चौकटीत बसवणे चूक ठरेल असे शर्मिला रेगे यांना वाटते.

भारतातील मुलभूत बदलाचा प्रश्न, जात, वर्ग आणि स्त्रीदास्यत्त्वाचा प्रश्न आज अडगळीत पडलेला आहे. जात आणि पुरुषसत्ताक व्यवस्था खिळखिळी होण्याऐवजी अधिकच प्रखर झालेली दिसत आहे. जात, वर्ग आणि पुरुषसत्ताकतेच्या आधारे होणारे सत्तासंबंध, अधिकारांचे नियंत्रण, जातीवर आधारित संसाधनाची मालकी, सांस्कृतिक संस्थांवरचे प्रभुत्व, जातीय अहंकार व एवढेच नव्हे तर जातीच्या आधारे ठरणारे नातेसंबंध, प्रेम व विवाह हे आजच्या भारतीय समाजाचे स्वरूप आहे. जात ही फक्त सामाजिक उतरंडीची व्यवस्था नाही तर भारतीय समाजातील आर्थिक शोषण, स्त्रीहक्कांची पायमल्ली यांचे मूळ जातव्यवस्थेमध्ये आहे. म्हणून पारंपरिक मार्क्सवादी चळवळीने व स्त्रीवादी चळवळीने जातीच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले असले, तो प्रश्न गौण मानला असला तरी आर्थिक शोषणाविरुद्ध व स्त्रीहक्काची लढाई जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाशी निगडित आहे म्हणून परिवर्तनवादी चळवळीसमोर जात हे मोठे आव्हान आहे; तसेच नफ्याच्या संस्कृतीवर आधारलेल्या आर्थिक, सामाजिक व्यवस्था व त्यामुळे निर्माण होणारी भयानक टोकाची विषमता, मूलभूत गरजा व हक्कांची होणारी पायमल्ली, मूठभरांच्या हितांसाठी सामान्यांच्या जगण्याच्या हक्कांवर सतत होणारे आक्रमण तसेच पुरुषसत्तावादाचे अत्यंत हिंस्त्र स्वरूप, एकूण जीवनाचे वस्तूकरण व लैंगिकीकरण, लैंगिकतेचे जागतिक बाजारीकरण ही आव्हाने दलित आणि स्त्रीवादी चळवळीसमोर आहेत असे त्यांना वाटते.

जातिनिहाय जनगणनेचे समर्थक आणि विरोधक आपापल्या भूमिका प्रखरपणे मांडत होते. यावर प्रसारमाध्यमांतूनही चर्चा घडत होत्या. त्यामुळे या विषयावर चिकित्सकपणे लिहिणे आवश्यक होते. हे लक्षात घेऊन जात आणि जनगणनेच्या संदर्भातील ऐतिहासिक आणि समकालीन पैलूंचा समाजशास्त्रीय आढावा घेणारे लेखन करण्याकरीता रेगे मॅडमनी मला प्रेरित केले. त्यासाठी त्यांनी नवाजबाई रतन टाटा ट्रस्टची फेलोशिपसुद्धा दिली. या फेलोशिपचा उद्देश शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनासाठी दर्जेदार वाचनसाहित्य उपलब्ध व्हावे असा होता. तसेच पुरोगामी चळवळींना गतिमानता प्रदान करण्यासाठी पूरक साहित्याची आवयकता लक्षात घेऊन सदर पुस्तक लिहिण्यात आले होते.

जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धात्मक युगात झपाट्याने बदलत असलेल्या समाजव्यवस्थेत, जात, वर्ग आणि पुरुषप्रधानतेचे नवीन प्रश्न, त्यापुढे हतबल झालेल्या प्रागतिक चळवळींची विघटनात्मक व पृथक परिस्थिती पाहता; आज पुन्हा एकदा नव्या जोमाने विज्ञानवादी, बुद्धीप्रामाण्यवादी व धर्मनिरपेक्ष लोकशाहीला पूरक असलेल्या बुद्धधर्माची तत्त्वे अंगिकारली तर हितकारकच होईल विशेषत: ढासळलेली नीतीमूल्ये, वाढत चाललेला चंगळवाद, भ्रष्टाचार, दहशतवाद, निस्तेज झालेल्या परंपरा व रुढी यांनी ग्रस्त झालेल्या समाजास बौद्ध तत्त्वज्ञान प्रकाश देऊ शकते, उत्तर होऊ शकते असे त्यांना वाटे.

जमातवादाला विरोध आणि दलित स्त्रीवादाचा स्वीकार त्या करायच्या. हिंदुत्ववादी संघटनांनी पुरोगामी पक्षाच्या, संघटनांच्या मागण्या गिळंकृत करण्यामागील दुतोंडीपणा स्पष्ट करून त्याच्या आणि आपल्या भूमिकांमधील फरक स्पष्ट करायला हवा. चळवळीअंतर्गत नकळतपणे आलेला पण असणारा जमातवाद, जातीयता यातून बाहेर पडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. दलित, आदिवासी स्त्रियांच्या दृष्टीने विचारप्रणालीची, चळवळीच्या वैचारिक भूमिकेची पुनर्मांडणी करणे गरजेचे आहे असे शर्मिला रेगे यांना वाटते. स्त्रीवादी संघटनांना पोखरण्याची जमातवादी संघटनांची चलाख खेळी (रविवार, ४ मार्च २००१, दैनिक लोकमत, अक्षररंग) या लेखात म्हणतात, मुलतत्ववादी संघटनांच्या महिला आघाडींच्या स्त्रीवादी अभ्यासकांकडून अभ्यास होतच असतो पण धर्मनिरपेक्षतेचा आव आणणाऱ्या संस्थांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण अशा छुप्या-खुल्या मूलतत्त्ववादी संघटनांचे वर्चस्व ज्ञान, न्याय आणि संस्कृतीच्या क्षेत्रात वाढत चालले असल्याचे अनेक घटनांमधून सिद्ध झाले आहे. जमातवादाला तोंड देताना, लिंगभावाचे राजकारण करताना आपल्याला कक्षा किती काटेकोरपणे आखाव्या लागतील हेच अधोरेखित होते.

एके दिवशी अचानकच विभागातून रेगे मॅडम आजारी असल्याचा फोन आला. फार उशिरा निदान झाले. पण रोगाने शरीर काबूत घेतले होते. रोग असाध्य होता. त्या शांतपणे रोगाला सामोरे जात होत्या. स्त्रीवादावर भक्कम मांड असूनही किंचितही पुरुषद्वेष्टी नसलेली, बहीणपणा आणि भाऊपणाचे प्रतिक असलेली शर्मिला! त्या माझ्या मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होत्या. स्वत:ची जात सोडून बाहेर पडणे ही फार कठीण गोष्ट. खूपच मोजक्या लोकांना हे जमले. त्यांच्या जाण्यामुळे त्यांच्या सानिध्यातील प्रत्येकाच्या मनात आपल्या नात्यातले, खूप जवळचे कुणी तरी गेल्याची उदासी साकळून आली. शर्मिला रेगे यांच्या जाण्यातून दलित-बहुजन स्त्रीवाद, अब्राह्मणी वैचारिक ज्ञानसंघर्ष, क्रांतिकारी पर्यायी संस्कृतीच्या क्षेत्रात न भरून येणारे नुक… …ीम!

•

**तुम्ही एक, आणखी फक्त एकेक!**
**इकडचा एक, तिकडचा एक**

आपल्या वर्गणीदारांना रौप्यमहोत्सवी वर्षासाठी एक विनंती. तुम्ही स्वतः तर कायम वर्गणीदार राहाच, पण आणखी फक्त एकेक नवीन वर्गणीदार मिळवून द्या. एक भारतातला आणि एक परदेशातला. एवढं केलंत तरी 'साऱ्याजणी'ला केवढा मोठ्ठा हातभार लागेल तुमचा!

**संपादक**